माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ५(१) व ५(२) अन्वये जिल्हा तक्रार निवारण प्राधिकारी यांना जन माहिती अधिकारी तसेच कलम १९(१) अन्वये अध्यक्ष, अपिलीय प्राधिकरण, मुंबई यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग (रोहयो),

शासन परिपत्रक क्र. : मग्रारो-२०१८/प्र.क्र.४२ /रोहयो-६अ

१६ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक : ११ जुलै, २०१८.

<u>वाचा</u> :- केंद्र शासनाच्या क्रमांक J११०११/२१/२००८-NREGA(Pt.)दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ अन्वये सुधारित मार्गदर्शक सूचना.

<u>प्रस्तावना</u> :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मजुरांना मिळावा, त्यामध्ये पारदर्शकता असावी, मजुरांच्या तक्रारींचे निराकरण व्हावे, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, याकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या कलम २७(१) नुसार प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी तक्रार निवारण प्राधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २००९ च्या आदेशान्वये दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक जिल्हयात तक्रार निवारण प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येते. अर्जदारास तक्रार निवारण प्राधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास अथवा सदर निर्णयाने समाधान होत नसल्यास तक्रार निवारण प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द अपील करण्याची तरतूद आहे. सदर अपीलावर निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय दि.२१.७.२०१४ अन्वये त्रिस्तरीय अपिलीय प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

<u>**शासन परिपत्रक**</u>

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमधील प्रकरण पाच (संकिर्ण) परिच्छेद १५ व १५.१ नुसार या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा तक्रार निवारण प्राधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ५(१) व ५(२) अन्वये राज्य जन माहिती अधिकारी तसेच कलम १९(१) अन्वये अध्यक्ष, अपिलीय प्राधिकरण, मुंबई यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०७१११५०९२३१५१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr. Pramod Sopan Shinde

Digitally signed by Dr. Pramod Sopan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=86df3b89584863ae114ab9dcc19318acf0e1e94714d4f3f2196a35403313b298, cn=Dr. Pramod Sopan Shinde
Date: 2018.07.11 15:11:49 +05'30'

(प्रमोद शिंदे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई, कोकणभवन, नवी मुंबई, पुणे विभाग, नाशिक विभाग, अमरावती विभाग.
७. सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
९. प्रबंधक, अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१०.सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
११.आयुक्त, नरेगा आयुक्तालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.
१२.सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (रोहयो), महाराष्ट्र राज्य.
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सर्व जिल्हा परिषदा.
१४.अध्यक्ष, अपिलीय प्राधिकरण, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.
१५.तक्रार निवारण प्राधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व जिल्हे.
१६.सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.निवडनस्ती.